**नियमित दिवाणी दावा क्र. ३२०/२०११ मधील निशाणी १४५ वरील आदेश.**

**(प्रविण उपाध्ये वि. सुभाष उपाध्ये वगैरे)**

**(CNR No. MHSN020014232011)**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्रमांक ८ प्राजक्ता नितीन पाटील यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी, तसेच त्यांचेविरुध्द दावा अवसान झाल्याचा हुकूम रद्द होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

**अर्जातील कथन थोडक्यात पुढीलप्रमाणे** –

२. प्रतिवादी नं. ८ प्राजक्ता नितीन पाटील या दि. ०९/०६/२०२३ रोजी मयत झालेले आहेत. वादी यांना कायदयाने विहीत केलेल्या मुदतीचे अज्ञान असुन त्याअनुषंगाने होणा–या परिणामांची कल्पना नव्हती. तसेच, त्यांच्या वारसांच्या अनुषंगाने आवश्यक असणारी माहिती व कागदपत्रे त्यांना उपलब्ध झालेली नव्हती. त्यामुळे प्रतिवादी क्रमांक ८ यांचे वारस रेकॉर्डवर वेळेत आणता आले नाही. परिणामी प्रतिवादी क्र. ८ चे वारसांची माहिती घेवून त्यांचे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी विलंब झाला आहे व प्रतिवादी क्र. ८ यांचेविरुध्द दावा अवसान झाल्याचा आदेश झाला. वादीने जाणुनबुजून मुदतीत वारस रेकॉर्डवर आणणेचे टाळलेले नाही.दाव्याच्या स्वरुपाचा विचार करता प्रतिवादी क्रमांक ८ यांचे वारस रेकॉर्डवर असणे आवश्यक आहेत. सबब, प्रतिवादी क्र.८ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब माफ होवून त्यांचेविरुध्दचा दावा अवसान झाल्याचा हुकूम रद्द होणेसाठी विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी यांनी अर्जाखाली म्हणणे दाखल करुन अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. दोन्ही विद्वान विधीज्ञांचा सविस्तर युक्तीवाद ऐकण्यात आला. संपूर्ण प्रकरणाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा हा वाटपाकरीता व कब्जा मिळण्याकरीता, तसेच निरंतर ताकीदीकरीता दाखल करण्यात आलेला असून मौल्यवान स्थावर मिळकती संदर्भात आहे. त्यामुळे, सदर दाव्यात दोन्ही पक्षकारांचे हितसंबंध असल्यामुळे प्रतिवादी क्र. ८ यांचे वारसांना प्रस्तुत दाव्यात वारस म्हणून समाविष्ट करणे न्यायोचित होईल. प्रतिवादी क्र. ८ या दि. ०९/०६/२०२३ रोजी मयत झाले आहेत. वादीने कागदयादी निशाणी क्रमांक १४४ कडे प्रतिवादी नं. ८ प्राजक्ता नितीन पाटील यांचा मृत्युदाखला दाखल केलेला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता, अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

:: **आदेश** ::

अर्ज (निशाणी १४५) मंजूर करण्यात आला.

VIBHA PRAKASH GAIKWAD
Digitally signed by VIBHA PRAKASH GAIKWAD
Date: 2024.07.09 11:16:13 +0530

सांगली. (विभा प्र. गायकवाड )
दि. ०६/०७/२०२४ २रे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
सांगली.